**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०१६, दि.१८/०९/२०१९**

**विश्रामबाग पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**विश्रामबाग पोलीस ठाण्याच्या पोलीसांकडुन गुन्हयातील पाहिजे असलेला आरोपी जेरबंद.**

दिनांक १८/०९/२०१९ रोजी विश्रामबाग पोलीस स्टेशनकडील तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक व्ही व्ही जाधव, पोलीस उप निरीक्षक चौगुले, पोलीस हवालदार शरद वाकसे, पोलीस नाईक धिरज पवार, पोलीस नाईक अविनाश जोशी , पोलीस शिपाई चेतन शिरोळकर, असे विश्रामबाग पोलीस ठाणेचे हद्दीत पेट्रोलिंग फिरत असतांना त्यांना गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणेशहर गु.र.नं. ३४६/२०१७, भा.द.वि.सं.कलम ३८१ या गुन्हयातील पाहिजे असलेला आरोपी नामे नरेशकुमार बलराम विष्णोई, रा. कायमचा पत्ता गाव खारी, पो धोरीमना, ता. धोरीमना, सध्याचा पत्ता खराडी युनायटी पार्क, नाईस कलेशक्शन, शुभ अगस्ती बिल्डींग पुणे हा बुधवार पेठ, तपकीर गल्ली, पुणे याठिकाणी आलेला असल्याचे समजले. सदर मिळालेल्या गोपनीय माहितीचे आधारे तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक व्ही व्ही जाधव, पोलीस उप निरीक्षक चौगुले, पोलीस हवालदार शरद वाकसे, पोलीस नाईक धिरज पवार, पोलीस नाईक अविनाश जोशी , पोलीस शिपाई चेतन शिरोळकर यांनी पाहिजे असलेला आरोपी नरेशकुमार बलराम विष्णोई याचा कसुन शोध घेवून त्याचेबाबत माहिती संकलित करुन व सापळा रचून सदर आरोपीस ताब्यात घेवून विश्रामबाग पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. ३४६/२०१७, भा.द.वि.सं.कलम ३८१ या गुन्हयातील वरनमुद पाहिजे असलेला व सुमारे ०२ वर्षापासुन पोलीसांना चकवा देवून आपले अस्तित्व लपवून वावरणारा आरोपी नरेशकुमार बलराम विष्णोई यास अटक करुन उत्कृष्ट कामगिरी केलेली आहे.

( दादासाहेब चुडाप्पा )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
विश्रामबाग पोलीस ठाणे,पुणे शहर.